दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ९५ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 25 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 95 | Pages 4 | Rate 4 Rs

## बॉलिवूडचा ही-मॅन काळाच्या पडद्याआड

**मुंबई**-बॉलिवूडमध्ये अनेक दशकं आपल्या अभिनयाने अमीट ठसा उमटवणारे दिग्गज कलाकार धर्मेंद्र यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे. काही दिवसांपासून प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू होते. तब्येत सुधारल्यानंतर त्यांना घरी आणण्यात आले होते, मात्र आज सकाळी साडेनऊच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतल्याची माहिती समोर आली आहे. वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.धर्मेंद्र यांच्या घराबाहेर चाहत्यांची वर्दळ वाढली. त्यांच्या प्रकृतीची माहिती सतत घेत असलेले बॉलिवूडमधील अनेक कलाकारही त्यांच्या भेटीसाठी धावले होते. निधनाची बातमी बाहेर आल्यानंतर अमिताभ बच्चन आणि अभिषेक बच्चन हे थेट विलेपार्ले येथील स्मशानभूमीकडे रवाना झाले. हेमा मालिनी देखील स्मशानभूमीत पोहोचल्या असून कुटुंबातील सदस्य अंत्यसंस्काराची तयारी करताना दिसले.

# काँग्रेसची अवस्था चिंताजनक, पक्ष दिवसेंदिवस कोसळतोय:उबाठाला गांभीर्याने घेण्याची गरज नाही

## जनता आमच्या मागे-मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### महायुतीत मन भेद होऊ देणार नाही

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, जनतेला भाजप आणि महायुतीवर विश्वास आहे. देवेंद्र फडणवीस यांचे सरकार हे विकासाचा विषय घेऊन काम करत आहे. डबल इंजिन सरकारला जनतेची गरज आहे, जनता आमच्या मागे उभी आहे.मोदी-देवेंद्र फडणवीस हेच विकास करु शकतात ही जनतेची भावना आहे, म्हणून महायुतीचे उमेदवार विजयी होत आहे. ५१ टक्के मते आम्हाला मिळणार आहे. काही ठिकाणी महायुती नाही तिथे आम्ही एकटे लढू पण महायुतीमध्ये मत अन् मनभेद होणार नाही यांची काळजी घेऊ.

### रुग्णांसाठी काम करणाऱ्यांना जागा देणार

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, कॅन्सर ग्रस्त रुग्णांसाठी काम करणाऱ्यांना महसूलच्या जागा देण्याचा आमचा विचार आहे. रुग्णांसाठी काम करणाऱ्या संस्थांना मजबूती मिळाली तर त्या अधिक रुग्णांसाठी त्या काम करू शकतील. रुग्ण सेवा आरोग्य सेवा हे सरकारचे ब्रीद आहे म्हणूनच आम्ही जागा देण्याचा निर्णय केला आहे.

नागपूर (वृत्तसंस्था)-काँग्रेसमध्ये कुणीही- कुणाला सहन करायला तयार नाही.त्यामुळे काँग्रेस पक्ष रोज कमजोर होत आहे, त्यांचे कार्यकर्ते रोज भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. नेत्यांमध्ये समन्वय दिसून येत नाही. असमन्वय असल्याने नेत्यांना कार्यकर्त्यांना सांभाळायला कुणी तयार नाही. त्यामुळे अस्वस्थ कार्यकर्ते रोज भाजपमध्ये प्रवेश करत आहेत, असे भाजपचे नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. यशोमती ठाकूर या यातूनच अस्वस्थ होत बोलल्या असतील असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, उबाठाच्या मुखपत्रात काय लिहून येते ते गांभीर्याने घेण्याची काही गरज नाही. अस्वस्थ लोक तिथे लिहितात त्यामुळे त्यांची काही काळजी करण्याचे काम नाही.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बंधू जे बिनविरोध निवडून आले आहेत. ते सृजन, सांस्कृतिक, धार्मिक कार्यामधील चांगले नेतृत्व आहे. तिथल्या संपूर्ण जनतेने त्यांच्या निवडीला मान्यता दिली आहे.आता आल्हाद कलोती यांच्याकडून अपेक्षा आहे तिथे आम्ही पर्यटनाचा एक प्रकल्प करतो आहे त्यांनी तिथे मोठे डेव्हलपमेंट करावी अशी आम्हाला अपेक्षा आहे. म्हणून जनतेने त्यांना अविरोध निवडून दिले आहे.



### सर्व ठिकाणी प्रचाराला जाणार

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसने जर मनसेसोबत युती केली असती तर बिहारमधील मतदारांनी काँग्रेसला मतदान केले नसते, म्हणून मनसेच्या मुद्द्यावर काँग्रेसने मनसे नको अशी भूमिका घेतली, हे सर्व जाणीवपूर्वक घेतली. उद्धव ठाकरे-राज ठाकरे युतीच्या चर्चा सुरू असल्याने काँग्रेसला पर्याय नसल्याने ते सोयीचे वक्तव्य करत आहेत. आम्ही पक्षाच्या प्रचारासाठी अनेक ठिकाणी प्रवास करणार आहोत. आमचे सर्व पदाधिकारी आणि स्टार प्रचारक नगर पालिकेच्या प्रचाराला जाणार आहोत.

# विष्णूभाऊं कसबे यांची मुंबई ते नागपूर पदयात्रा लोह्यात

## शेकडो कार्यकर्त्यांनी केले जोरदार स्वागत

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लहुजी शक्ती सेना संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे यांनी अनुसूचित जातीत आरक्षण वर्गीकरण अ ब क ड जातीय वर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणीच्या मागणीसाठी मुंबई ते नागपूर पदयात्रा जोमाने सुरू केली असून या मार्गावरील प्रत्येक गावातील खेड्यापाड्यातील या मार्गावरील शेतातील बांधावरील समाज बांधव विविध ठिकाणी त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळतं आहे.या वेळी लोहा शहरातील युवा वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. मातंग हृदय सम्राट विष्णूभाऊ कसबे यांचें स्वागत फटाक्यांच्या आतिषबाजी सह पुष्पहार घालून मोठ्या उत्साहात केले स्वागत.

मुंबई ते नागपूर दरम्यान अनेक गावांतून शहरातून पदयात्रेला जोरदार प्रतिसाद मिळत



असून सामाजिक प्रश्न मांडण्याचा आणि शासनाचे लक्ष वेधण्याचा हा प्रभावी मार्ग ठरतं आहे असे दिसून येते.ही पदयात्रा पुढील काही दिवसांत विदर्भाच्या दिशेने पुढे सरकणार असून या मार्गातील विविध शहरांत सभा, संवाद आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.


लोहा शहरातील उपस्थित समाज बांधवांनी लहुजी शक्ती सेना संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे व कैलास दादा खंदारे, नितीन भाऊ दोडके सह आदी कार्यकर्ते यांना पुढील प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या सामाजिक लढ्याला समर्थन केले.या उत्साहात लोह्यातील युवा वर्ग मोठ्या प्रमाणात होता. या वेळी गणेश दाढेल,चंदू धोंगडे, रामदास बोराडे,श्रावण लोंढे,करण सावळे,सुनिल ससाणे,आकाश खानपटे,गजानन दाढेल,शैलेश दाढेल,आकाश भालेराव,विनोद भिसे,रोहित सावळे,शिवकांत कंधारे,ओंकार घुले व डॉ अण्णा भाऊ साठे कांती सेना सोशल मिडिया लोहा तालुका अध्यक्ष. किरण दाढेल,आकाश खनपट्टे, हनमंत कंधारे आदी समाज बांधव उपस्थित होते.

# तळोदा येथे घरफोडी: बंद घराचा कडी कोयंडा तोडून १.२१ लाखांचा ऐवज लंपास

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी.**

तळोदा शहरातील डी.बी. हट्टी परिसरात अज्ञात चोरट्याने एका बंद घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश करत, सोन्याचे दागिने आणि रोकड असा एकूण १,२१,०००/- (एक लाख एकवीस हजार रुपये) किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना सोमवारी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून तळोदा पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दिपक तुकाराम कुंभार (वय ३४, रा. डी.बी. हट्टी) यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली आहे. दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे २.३० ते ४.३० वाजेच्या सुमारास ही चोरी झाली असण्याची शक्यता आहे. फिर्यादी दीपक कुंभार आणि साक्षीदार कल्पनाबाई भटु पाटील यांचे तळोदा येथील राहते घर बंद असताना, अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने घरातून एकूण ८६,०००/



- किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र (१२ ग्रॅम), कानातील रिंगा (३ ग्रॅम), सोन्याचे कुडके (२ नग) आणि सोन्याचे पाच तुकडे.त्यांचबरोबर फिर्यादीचे १५,०००/- आणि साक्षीदार कल्पनाबाई पाटील यांचे २०,०००/- अशी एकूण ३५,०००/- रोख रक्कम चोरीला गेली आहे. चोरीला गेलेल्या मालाची एकूण किंमत १,२१,०००/- रुपये इतकी आहे. या घटनेनंतर दिपक कुंभार यांनी तळोदा पोलीस स्टेशनमध्ये लेखी फिर्याद दिली. त्यानुसार, तळोदा पोलीस स्टेशनने गुन्हा नोंदणी क्रमांक ३२५/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ) आणि ३३१(४) (घरफोडी आणि चोरी) नुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक २४/११/२०२५ रोजी संध्याकाळी ६:३३ वाजता पूर्ण झाली. दाखल अंमलदार म्हणून पोलीस हेड कॉन्स्टेबल गौतम बोराळे यांनी कार्यवाही केली आहे. पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या आदेशाने या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल विनोद नाईक यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याचा शोध सुरू केला असून, चोरीला गेलेल्या ऐवजाचा आणि आरोपीचा शोध घेण्यासाठी तपास मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांनी 'महाविस्तार एआय' ॲपचा वापर वाढवावा; डिजिटल कृषीक्रांतीत सहभागी व्हा-तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे

दैनिक वादळ वार्ता

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

कृषी क्षेत्रात वाढत्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झाला आहे. बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांपुढे निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेता कृषी विभागाने विकसित केलेले 'महाविस्तार एआय' हे अत्याधुनिक मोबाईल प आता शेतकऱ्यांसाठी मोठे सहाय्यक ठरणार आहे.मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे प शेतकऱ्यांच्या सर्व गरजांसाठी एकाच ठिकाणी वैज्ञानिक माहिती उपलब्ध करून देत असून याचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केले.कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने हे ॲप तयार केले असून पीक व्यवस्थापन, हवामान अंदाज, रोग व कीड निदान, खत-पाणी व्यवस्थापन, बाजारभाव अशा सर्व महत्त्वाच्या






माहितीची उपलब्धता एका क्लिकवर मिळते. आष्टी तालुका कृषी कार्यालयाकडून या ॲपबाबत जनजागृती सुरू असून शेतकऱ्यांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून डिजिटल कृषी क्रांतीत सहभागी व्हावे, असेही तरटे यांनी स्पष्ट केले.'महाविस्तार एआय' पद्वारे शेतकरी आपल्या पिकांचा फोटो अपलोड केल्यास रोग, कीड किंवा पोषणासंबंधी समस्या एआय तंत्रज्ञानाद्वारे ओळखली जाते आणि त्यावर त्वरित उपाययोजना सुचवली जाते. तसेच शासकीय योजनांची माहिती, विविध अनुदाने, पिकविमा संदर्भातील मार्गदर्शन आणि प्रगतीशील शेतकरी व कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांशी संवादाची सुविधा यात उपलब्ध आहे.हे प गुगल प्ले स्टोअरवर विनामूल्य उपलब्ध असून शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलमध्ये ते डाऊनलोड केल्यास घरबसल्या पीक व्यवस्थापनासंबंधी सर्व मार्गदर्शन मिळू शकते. पचा वापर करून शेतकऱ्यांनी उत्पादनक्षमता वाढविण्यास मदत होईल, असा विश्वास तरटे यांनी व्यक्त केला.

**'महाविस्तार एआय' पचे प्रमुख लाभ**

हवामानाचा स्थानिक स्तरावरील रिअल टाइम अंदाज

पिकांचे रोग व कीड निदान - फोटो अपलोड केल्यावर त्वरित उपाय

विविध बाजार समित्यांतील अद्ययावत बाजारभाव

पेरणी, सिंचन, खत व्यवस्थापन व संरक्षण उपायांचे वैज्ञानिक मार्गदर्शन

शासकीय योजना, अनुदान व विमा माहिती एकाच ठिकाणी

मराठी भाषेत तज्ज्ञ सल्ला आणि एआय आधारित तत्काळ उत्तरे



## संपादकीय

# तगडा नायक,उमदा माणूस

पंजाबच्या मातीतून आकाराला आलेलं शिल्प म्हणजे धर्मेंद्र. बलदंड शरीर, तितकाच सोज्वळ चेहरा आणि दमदार अभिनय. अलीकडच्या काळात कारकिर्दीनंतरचा निवांतपणा अनुभवणारा हा तगडा नायक आणि उमदा माणूस अखेर अनंताच्या प्रवासाला गेला. चार दशकं सिनेचाहत्यांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या या 'ही मॅन'च्या आठवणी...

१९६०च्या दशकात दोन तरुण उमदे, ताजेतवाने कलाकार एकदमरूपेरी पडद्यावर झळकले. चित्रपट होता 'शादी'. साधा कौटुंबिक चित्रपट. पुढे 'भारत' बनून नायक निर्माता अन् दिग्दर्शक म्हणून लोकप्रिय ठरलेला मनोजकुमार अन् नंतर तगडा हिरो म्हणून गाजलेला धर्मेंद्र हे दोघे त्यावेळी अगदीच नवशिके होते. 'पंजाब दा पुत्तर' आणि 'गरम धरम' म्हणून फिल्मी मॅगझिन्सनी ज्याचा खूप उदोउदो केला तो धर्मेंद्र,आधी अगदीच साधा, लाजरा बुजरा अन् शांत होता.'अंडर प्ले' करण्याकडे त्याचा कल होता. १९६२ मध्ये आलेल्या 'अनपढ' या मोहन सैगल दिग्दर्शित चित्रपटात माला सिन्हाला जबरदस्त भूमिका मिळाली. ती अशिक्षित आणि तिचा नवरा धर्मेंद्र चक्क प्रोफेसर. सुटाबुटातला हा प्राध्यापक त्याने समरसून रंगवला. त्याची भूमिका चित्रपटाच्या आधीच संपते. पण तरी तो लक्षात राहून गेला. 'आप की नजरों ने समझा' या गाण्याच्या वेळी धर्मेंद्र–माला सिन्हा ही जोडी पडद्यावर झकास दिसली. 'अनपढ' दणकून चालला आणि त्याचा फायदा दोघांनाही मिळाला. 'आप की परछाईयाँ' आणि 'देवर' या चित्रपटांमधून धर्मेंद्र आणखी परिपक्व होत गेला. मदनमोहन (अनपढ, आप की परछाईयाँ) आणि रोशन (देवर) यांची गाणी तेव्हा खूप श्रवणीय ठरली.धर्मेंद्र प्रेक्षकांच्या खरा लक्षात आला तो 'फूल और पत्थर' या भव्य रंगीत चित्रपटामुळे. इथे मीनाकुमारी त्याची नायिका होती. ती विधवा आणि असहाय्य तर हा गुन्हेगारी जगतात बुडालेला शराबी. तिची शांत सोज्वळ प्रतिमा तर हा आक्रमक दणकट व्यक्तिमत्वाचा पत्थरदिल इन्सान, पण शांती (मीनाकुमारी) आपल्या व्यक्तिमत्वाने शाकाचा (धर्मेंद्र) कायापालट घडवते. दोन्ही व्यक्तिमत्त्वांमधला विरोधाभास मोठा मनोज्ञ ठरला. पांढऱ्याशुभ्र साडीमध्ये मीनाकुमारी अन् पिळदार शरीराचं दर्शन घडवणारा 'ही मॅन' धर्मेंद्र ही जोडी प्रेक्षकांना रोमांचित करून गेली. रवीचे संगीत कर्णमधूर होते. रंगांची उधळण, श्रीमंत निर्मिती हे 'फूल और पत्थर'चे मोठे आकर्षण ठरले. मीनाकुमारीला आगीतून वाचवताना धर्मेंद्रचा चेहरासुद्धा खूप होरपळून निघाला. 'अगली फिल्म में आग का सीन जरूर डालना' ही उपरोधित प्रतिक्रिया देत मीनाकुमारी आणि धर्मेंद्र यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. दोघांनी 'पूर्णिमा', 'चंदन का पलना' अशा चित्रपटांमध्ये एकत्र काम केले. रामानंद सागर यांच्या 'आँखे' या चित्रपटात धर्मेंद्र गुप्तहेर म्हणून चमकला. माला सिन्हाबरोबर त्याची जोडी जमली. त्याचा पडद्यावरचा वावर आता अधिक जोशिला अन् आत्मविश्वासपूर्ण वाटू लागला. इथे पुन्हा एकदा रवीचे संगीत वेगळे आणि वैशिष्टयपूर्ण ठरले.बी. आर. फिल्म्सच्या यश चोप्रा दिग्दर्शित 'आदमी और इन्सान'मध्ये धर्मेंद्रचा डॅशिंग रोल होता. सायरा बानू अन् मुमताज अशा दोन नायिका इथे धरमबरोबर दिसल्या. 'चैताली' हा बिमल रॉय यांचा अपुरा चित्रपट हृषिकेश मुखर्जींनी पुरा केला. त्यातले धर्मेंद्रचे योगदान मोठे होते. सायरा बानू इथे निराळ्या 'ऑफ बिट रोल'मध्ये चमकली. हृषिकेश मुखर्जींसमवेत धर्मेंद्रचे सूर छान जुळले. त्यांच्या 'सत्यकाम', 'चुपके चुपके', 'गुड्डी' अशा अनेक चित्रपटांमधून धर्मेंद्र विभिन्न भूमिकांमध्ये दिसला. 'सत्यकाम'मध्ये धर्मेंद्र ध्येयवेडा, नि:स्पृह अभियंता म्हणून वावरला. शर्मिला टागोर, संजीवकुमार असे जबरदस्त कलावंत समोर असताना धर्मेंद्र ही भूमिका खरोखर जगला. 'सत्यकाम'ला पुरेसे यश न मिळाल्यामुळे धर्मेंद्र आणि हृषिदा खूप निराश झाले असणार. 'गुड्डी'मध्ये तर धर्मेंद्र सिनेनट धर्मेंद्र म्हणूनच दिसला आणि त्याने बहार उडवून दिली. जया भादुरीनंतर 'गुड्डी'मध्ये तोच लक्षात राहून गेला.'चुपके चुपके'मध्ये त्याने अचूक टायमिंग साधत शर्मिला अन् अमिताभ बच्चन यांच्यापेक्षा प्रभाव पाडत विनोदी अभिनयातले स्वत:चे कर्तृत्व सिद्ध केले. नूतन (सूरत और सीरत), आशा पारेख (समाधी), मुमताज (लोफर, झील के उस पार) अशा अनेक नायिकांबरोबर त्याने काम केले तरी त्याची सरस जोडी जमली ती हेमा मालिनीबरोबर. 'मैं कहीं कवि न बन जाऊँ'(प्यार ही प्यार), 'ये शमा तो जली' (आये दिन बहार के), 'आज मौसम है बेईमान'(लोफर) या महंमद रफीच्या सुरेल गीतांना त्याने रूपेरी पडद्यावर यथोचित न्याय दिलाय यात शंकाच नाही.'तुम हँसी मैं जवा', 'शरारत', 'नया जमाना', 'आझाद', 'जुगनू', 'आसपास', 'राजा जानी', 'चरस' अशा अनेक चित्रपटांमध्ये धर्मेंद्र–हेमा मालिनी जोडीने चाहत्यांना खूश करून टाकले. 'मुन्ने की अम्मा रे'(तुम हँसी मैं जवाँ) या गाण्यात धर्मेंद्रने लोटपोट हसवले. 'राजा जानी' आणि 'जूगनू' मधला हेमा–धर्मेंद्रचा रोमान्स खूप रोमांचक ठरला. राज कपूर–नरगिस जोडीनंतर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी 'हिट पेअर' म्हणून धर्मेंद्र –हेमा मालिनी यांचा प्रचंड बोलबाला झाला. हेमा मालिनी 'आझाद'मध्ये त्याचे 'लंबा कद चौडा सीना' असे वर्णन करते तेव्हा तिच्या चेहऱ्यावरचे भावदर्शन मोठे विलोभनीय होते. रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' या चित्रपटात या जोडीने धुमाकूळ घातला. 'कोई हसीना जब' या गाण्यातला रूसवा–फुगवा लाजवाब ठरला. पाण्याच्या टाकीवर चढून धरमने दारूच्या नशेत म्हटलेले धमाल संवाद 'शोले'चे मोठे आकर्षण ठरले. 'सीता और गीता' मधला धर्मेंद्रचा डोंबारी अफलातून होता. 'अनाडी है कोई खिलाडी है कोई' या मन्ना डेच्या गाण्यात धर्मेंद्रने बहार उडवून दिली. राजू (आझाद) हे रफीचे गीत घोड्यावर बसून गाताना धरमने छोट्या मुलांना आकर्षित करून घेतले. 'धरम–वीर'मध्ये त्याने प्राणला तोडीस तोड झुंज दिली. 'कहानी किस्मत की' या अर्जुन हिंगोरानी यांच्या चित्रपटात 'रफ्ता रफ्ता देखो' या किशोरने गायलेल्या गाण्यात रेखासमवेत 'अग ये, जवळ ये लाजू नको' म्हणत मराठमोळ्या अवतारात धर्मेंद्रने प्रचंड धमाल उडवून दिली. उत्स्फूर्त, अनावर भावनांचा हा अनोखा हंगामा, प्रेक्षकांमध्ये मोठा जल्लोष निर्माण करत लोकप्रियतेची बुलंदी गाठून गेला. दिल्लगी (हेमा मालिनी), दोस्त (हेमा, शत्रुघ्न), मेरा गाव मेरा देश (आशा पारेख, विनोद खन्ना), रखवाला, बाजी (रेखा) हे धर्मेंद्रचे आणखी काही गाजलेले चित्रपट. धर्मेंद्रच्या अभिनयात उपरोध, आर्त उदासी, प्रणयातूर प्रेमी या साऱ्या भावभावना दिसत. 'माँऽऽ' ही त्याची ओथंबलेली हाक आणि 'एक एक को चुन चुनके मारूँगा' हा उद्रेक प्रेक्षकांच्या अंतर्मनाला स्पर्श करून जाई.हेमा मालिनीबरोबर त्याचे दुसरे लग्न देशभर खळबळ माजवून गेले. पण त्या दोघांच्या चाहत्यांना विलक्षण आंनद झाला एवढे नक्की. धर्मेंद्रने नव्या पिढीला दणकट बांधेसूद शरीरयष्टीचे महत्त्व पटवून दिले. आज आमिर खान, सलमान खान, हृतिक रोशन त्याचे अनुकरण करताहेत. 'प्रतिज्ञा' हा धर्मेंद्रचा सर्वांगसुंदर चित्रपट. 'मैं जट यमला पगला दिवाना' या गाण्यातला त्याचा हंगामा विसरणे शक्य नाही. सनी आणि बॉबी ही मुले आज चित्रपट गाजवत आहेत. आता तो आपल्यामध्ये नसला तरी नानाविध भूमिकांमधून ठेवलेला आठवणींचा नजराणा चित्रपटरसिक कधीच विसरणार नाहीत. या व्यक्तिरेखांमध्ये धर्मेंद्रने उडवून दिलेली धमाल आणि दाखवून दिलेले अनेक प्रकारचे भाव चाहते हयातभर लक्षात ठेवतील.

# परळी नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (शरद पवार गट) आघाडीचा जोरदार प्रचार

## खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासह प्रमुख नेत्यांचा आज शहरात प्रचार दौरा; विविध प्रभागांत कॉर्नर बैठकांचे नियोजन

दैनिक वादळ वार्ता
परळी (प्रतिनिधी)



परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीला वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) आणि मित्रपक्ष आघाडीने प्रचाराची आक्रमक सुरुवात केली आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.संध्याताई दिपकनाना देशमुख यांच्यासह नगरसेवक पदाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पक्षाचे प्रमुख नेते मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५ रोजी परळीत प्रचार दौरा करणार आहेत. शहराच्या विविध भागांत प्रचार फेरी तर काही ठिकाणी महत्त्वपूर्ण कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.शहरात होणाऱ्या आजच्या प्रचार दौऱ्यात बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे, राजेभाऊ फड (प्रदेश सरचिटणीस) आणि दीपक नाना देशमुख हे नेते विशेषतः सहभागी होणार असून, दिवसभर विविध प्रभागांमध्ये सभा आणि प्रचारफेऱ्यांद्वारे मतदारांशी थेट संवाद साधणार आहेत. सकाळी ९ वा. : प्रभाग ८ मधील प्रचार फेरी, सकाळी ११ वा. : प्रभाग ७ व ८ येथील संयुक्त सभा, सायं. ५ वा. : प्रभाग १ व ९ मधील प्रचार फेरी, सायं. ७ वा. : प्रभाग १ व ९ येथील संयुक्त सभा याप्रमाणे आजच्या प्रचार फेरी आणि कॉर्नर बैठकांचे नियोजन करण्यात आल्याची माहिती प्रचार समितीकडून देण्यात आली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पार्टी) आणि मित्रपक्ष आघाडीतर्फे या दौऱ्यात हजारोंच्या संख्येने कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. परळीच्या विकासाचा नवा रोडमॅप, लोककल्याणाचे आश्वासन आणि स्थानिक प्रश्नांवरील ठोस भूमिका या सभांमध्ये मांडली जाण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. परळी नगरपरिषद निवडणूक चुरशीची होत असून, आघाडीच्या या प्रचार दौऱ्यामुळे स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल लागली आहे.

**निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची पक्षपाती भूमिका!**

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर हे कोणाच्यातरी दबावाखाली किंवा सांगण्यावरून जाणीवपूर्वक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या उमेदवारांना वेठीस धरण्याचे काम करीत आहेत. तसेच, परळीतील इतर प्रशासन देखील, एकतर्फी पक्षपाती भूमिका घेत आहेत. याची रीतसर तक्रार राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्तांना व संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख व व दीपक रंगनाथ देशमुख यांनी केली आहे. यामुळे परळीत प्रशासनाच्या भूमिकेबाबत नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिक राजकारणात चर्चेला ऊत देणारी बाब म्हणजे गणेशपार येथील सभेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी परवानगी नाकारली आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांवर स्थानिक आमदार तसेच मंत्र्यांचा दबाव असल्याची जोरदार चर्चा शहरात रंगत आहे. त्यामुळे प्रशासनाची निष्पक्षता आणि निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. प्रत्यक्ष मतदान बुधवर काय परिस्थिती असेल याची यावरून कल्पना येते. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तर परळीत लोकशाही टिकून राहील किंवा लोकशाहीत निवडणुका होतील.

# गुरु तेग बहादुरजींनी धर्मांतर विरोधातील बलिदानाचा धगधगता इतिहास प्रेरणादायी–आ.संग्राम जगताप

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी



श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर–घर लंगर सेवेच्या माध्यमातून पंजाब आणि महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील पूरग्रस्तांना देण्यात आलेल्या सर्वसमावेशक मदत उपक्रमाची यशस्वी सांगता करण्यात आली. गुरु तेग बहादुरजी यांच्या सर्वोच्च बलिदानाच्या ३५० वर्षांच्या स्मृतिदिनी या उपक्रमाची सांगता करत शहरातील गोशाळांना पशुखाद्याचे वाटप करण्यात आले.

आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते शहरातील विविध गोशाळांना पशुखाद्याचे वितरण करण्यात आले. तारकपूर येथील घर–घर लंगर सेवेच्या अन्नछत्रालयात आयोजित कार्यक्रमात जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंग धुप्पड, अमोल गाडे, राजेंद्र कंत्रोड, गुलशन कंत्रोड, मुन्ना जग्गी, प्रशांत मनोत, जय रंगलानी, कैलाश नवलानी, सोमनाथ चिंतामणी, सुनील थोरात, जगजीतसिंग गंभीर, राजू जग्गी, अनिश आहुजा, राजा नारंग, संजय आहुजा, किशोर खुराणा, प्रीतमसिंग धीलो तसेच माऊली गोशाळेचे प्रसाद शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शीख धर्मातील नववे गुरु गुरु तेग बहादुरजी यांनी धर्मसंरक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने देशभरात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. धर्माकरिता योगदान देऊन धर्मांतर विरोधात ते उभे राहिले. त्यांच्या बलिदानाचा धगधगता इतिहास प्रेरणादायी आहे. या विचारांना उजाळा देण्यासाठी त्यांचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. घर–घर लंगर सेवेने कोरोना काळात भुकेल्यांच्या सेवेसाठी अपार परिश्रम घेतले; ही सेवा आजही तितक्याच ताकदीने कार्यरत आहे. संकटाच्या प्रत्येक काळात श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान समाजाच्या पाठीशी उभा राहतो, ही लंगर परंपरेची खरी ओळख असल्याचे त्यांनी सांगितले.श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून पंजाब आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी मोठ्या प्रमाणात मदत साहित्य पाठविण्यात आले. यामध्ये १५ टन पशुखाद्य, १० हजार व्यक्तींसाठी कपडे, २०० कुटुंबीयांना गृहपयोगी भांडी, १०० विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण शैक्षणिक साहित्य व ३ गावांना पुरेल इतकी प्राथमिक उपचारांची औषध किट्सचा समावेश होता. या सर्व मदतीत नगरकरांनीही मोठा हातभार लावला असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून घर–घर लंगर सेवा भुकेल्यांना अन्न, गरजू कुटुंबांना धीर आणि संकटात लोकांना साथ देत सतत कार्यरत आहे. आता पूरग्रस्तांच्या मदतीची सांगता करताना, गुरु परंपरेचा सेवा–समर्पणाचा संदेश देण्यात आला.

# डॉ.एस.बी.निमसे विद्यार्थ्यांचे प्रेरणास्रोत–डॉ.सुप्रभा कुलकर्णी

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी




जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या न्यू आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. उर्फ सर्जेराव निमसे हे गणित विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रेरणास्त्रोत आहेत. गणित शिकविण्याबरोबरच विद्यार्थ्यांना कोणत्याही स्वरुपाच्या येणार्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांचा कायमच पुढाकार असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना ते पितृतुल्य वाटतात, असे प्रतिपादन येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुप्रभा कुलकर्णी यांनी नुकतेच केले.जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या न्यू आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. उर्फ सर्जेराव निमसे यांचा अमृतमहोत्सव गणित माजी विद्यार्थी संघाच्यावतीने नुकताच यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात संपन्न झाला, त्यावेळी निमसे सरांच्या व्यक्तिमत्वाविषयी विद्यार्थ्यांच्यावतीने बोलताना त्यांनी वरील मत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व जाणते नेते शरद पवार, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. निंबा कृष्ण ठाकरे, इतर सतरा विद्यापीठांचे कुलगुरू, परदेशातील बरेचसे गणितज्ञ विराजमान होते. सरांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडीप्राप्त अनेक विद्यार्थी तसेच न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या दोनशेवर विद्यार्थ्यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

या कार्यक्रमात प्रा. डॉ. सुप्रभा कुलकर्णी म्हणाल्या, प्रा. निमसे सर्व विद्यार्थ्यांचे प्रेरणास्रोत आहेत. विद्यार्थीदशेत वेगवेगळ्या कारणांमुळे विद्यार्थ्यांना येणार्या अडचणी दूर करण्यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असत. पदवी शिक्षण चालू असताना काही विद्यार्थिनींचे लग्न होते. अशा विद्यार्थिनींची घर आणि शिक्षण अशी तारेवरची कसरत होते. अशा विद्यार्थिनींचे शिक्षण अर्धवट राहू नये यासाठी ते नेहमी प्रयत्न करीत. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी रात्रीपर्यंत वर्गखोल्या वापरण्यास देणं हे सरांच्या निर्णायक व्यक्तिमत्त्वाचे द्योतक होय.

प्रा. डॉ. कुलकर्णी पुढे म्हणाल्या, निमसे सर हे पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आहेत. एखाद्यावर कोणतीही जबाबदारी टाकली तर सर नेहमीच त्याच्यावर पूर्ण विश्वास दाखवतात. यामुळे ती व्यक्ती मनापासून काम करून अपेक्षित यश संपादन करते. सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना त्या म्हणाल्या, सरांना कोणतीही उपमा देण्याची गरज नाही. अशी कोण तीही उपमा सरांचे व्यक्तिमत्त्व पूर्ण दाखवू शकत नाही. गणित विभागातील त्यावेळच्या प्राध्यापकांची तुलना त्यांनी दत्तमूर्तीशी केली. तत्कालीन चारही प्राध्यापक एकदिलाने काम करीत असत, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# पी पी गँग विरोधात संघटित गुन्हेगारी अंतर्गत कठोर कारवाईचे पोलीस अधीक्षकांचे आदेश

दैनिक वादळ वार्ता।
अहिल्यानगर । प्रतिनिधी

दिल्लीगेट परिसरातील गोगादेव मंदिराजवळील म्युनिसिपल कॉलनीमध्ये चव्हाण कुटुंबावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या प्रकरणातील आणखी एका आरोपीचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. एस. लोणे यांनी फेटाळला आहे.आरोपी आदित्य सकट असे जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केलेल्या आरोपीचे आणावं आहे. या प्रकरणात सरकार पक्ष फिर्यादीच्या बाजूने जेष्ठ विधिज्ञ अभिजित पुप्पाल यांनी बाजू मांडली. याप्रकरणाचा तपास तोफखाना पोलीस ठाण्याकडून तो स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. त्यात आता एल सी बी ने सखोल तपास करून ७९० पानाचे आरोपपत्र न्यायालयात सादर केले आहे. या खटल्याची हकीकत अशी की , दि. २४ जुलै रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास, पवन दिपक पवार (कुख्यात पी पी गँग चा म्होरक्या )याच्या सांगण्यावरून शिवम पवार, आदित्य सकट उर्फ बाब्याभाऊ, आदर्श साळुंखे, प्रशांत दळवी, गणेश भुजबळ, हर्षल सारसर, अमोल गोरे, किरण झरे, चेतन निंदाणे, राहुल रोहकले, अयान शेख, यश पवार व काही अनोळखी इसम यांनी चव्हाण कुटुंबावर नियोजित कट रचून हल्ला केला होता. हल्लेखोरांनी लोखंडी रॉड, लाकडी दांडके व धारदार शस्त्रांचा वापर करून घरात घुसत प्राणघातक मारहाण केली. या हल्ल्यात रोहन जयेंद्र चव्हाण (वय २७), त्यांचे चुलते जितेंद्र चव्हाण, पत्नी निलम चव्हाण, आत्या देवयानी हंस यांच्यासह अन्य नातेवाईक गंभीर जखमी झाले. महिलांवर अश्लील चाळे व लज्जास्पद वर्तन झाल्याची तक्रार आहे. हल्लेखोरांनी सीसीटीव्ही कॅमेरे फोडले. घरातील सामानाची तोडफोड केली, मोपेडचे नुकसान केले. तसेच परिसरात बिअरच्या बाटल्या, दगडफेक करत दहशतीचे वातावरण निर्माण केले.

या प्रकरणी पोलिसांनी सात आरोपींना अटक केली होती. यातील सहा आरोपीचा जमीन अर्ज अगोदरच फेटाळण्यात आला होता. नंतर काल आरोपी आदित्य सकट याने जामिनासाठी अर्ज केला. फिर्यादीच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अभिजीत पुप्पाल यांनी युक्तिवाद करताना, ही घटना अत्यंत गंभीर असून आरोपींकडून हत्यारेही जप्त करण्यात आलेली नाही . टोळीने केलेला हल्ला प्राणघातक स्वरूपाचा असून त्यांना जामीन दिल्यास पुन्हा गोंधळ घालण्याची व दमदाटी करण्याची शक्यता नाकारता येत नाही असे सांगितले. या आरोपींचा दोन वर्षासाठी हद्दपार प्रस्ताव प्रलंबित आहे,व या गुन्हेगारांना मोक्कांतर्गत कारवाई करावी असे आदेश नाशिक पोलीस महासंचालकानी दिले होते. असे न्यायालयाच्या युक्तिवादामध्ये त्यांनी म्हटले आहे.

# विकास आणि विचारधारा हाच शिवसेनेचा अजेंडा

## शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून प्रचाराला सुरुवात

### डहाणू, जव्हार पालघर आणि वाडा येथे जाहीर सभा; विकासाच्या बाजूनं उभ राहण्याचा पालघरवासीयांचा निर्णय

दैनिक वादळ वार्ता
**पालघर । प्रतिनिधी**

विचारधारा आणि विकास या दोन अजेंड्यावर शिवसेना पुढे चालली आहे. मागास जिल्हा असलेल्या पालघरचा चेहरामोहरा बदलणारे मोठे प्रकल्प सरकारने या जिल्ह्याला दिले. येथील शेतकरी, मच्छिमार आणि आदिवासी बांधवांचे प्रश्न सोडवून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करु, असे आश्वासन शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पालघरवासीयांना दिले. नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ आज उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पालघर जिल्ह्यातून केला. जिल्ह्यातील पालघर, डहाणू, जव्हार आणि वाडा या चार ठिकाणी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी झंझावाती प्रचार सभा घेतल्या. या सभांना लाडक्या बहिणींसह स्थानिकांची अलोट गर्दी होती. पालघर नगर परिषदेसाठी शिवसेनेचे उत्तम घरत हे नगराध्यक्षपदाचे उमेदवार आहेत. पालघरमधील जाहीर सभेत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, जिंदाल जेट्टीसंदर्भात स्थानिकांवर अन्याय होऊ देणार नाही. पालघर जिल्ह्यातील लोकांवर अन्याय





होतील, असे प्रकल्प होऊ देणार नाही. लोकांवर वरवंटा फिरवून विकास करणार नाही, असे ते म्हणाले. अडीच वर्षात राज्याचा सर्वांगीण विकास केला तसेच लोकाभिमुख्य कल्याणकारी योजना राबवल्या, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेत अनेक अडथळे आले, मात्र ही योजना सुरु केली आणि ती पुढेही सुरुच राहणार, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली. ज्यांनी सत्तेसाठी विचार सोडले आणि विकासाला विरोध केला त्यांची अवस्था महाराष्ट्राने पाहिली, अशी घणाघाती टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठावर केली. लोकांना विकास हवाय म्हणून पालघरमध्ये सर्वांनी एकत्र येऊन विकासाच्या बाजूनं उभ राहण्याचा निर्णय घेतल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.डहाणू येथे शिवसेना नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजेंद्र माच्छी आणि नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांसाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सभा घेतली. या सभेत बोलताना ते म्हणाले की डहाणूची मागास तालुका अशी ओळख लवकरच पुसली जाईल, डहाणूत विकासाचा भगवा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. डहाणूतील मच्छिमारांचे प्रश्न, किनारपट्टीवरील मच्छिमारांच्या घरांचा प्रश्न, युडीसीपीआर, वनपट्टे याविषयीचे प्रश्न सोडवले जातील. विकासापासून वंचित डहाणूला पहिल्या क्रमांकाचा तालुका बनवू, असे आश्वासन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. जव्हारमध्ये नगराध्यक्षपदासाठी शिवसेनेच्या उमेदवार पद्मा राजपूत आणि शिवसेनेच्या पॅनलसाठी घेतलेल्या सभेत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी जातपात धर्म पंथ न बघता एक आदर्श राज्य घडवले. तोच आदर्श घेऊन शिवसेना पुढे जात आहेत. राज्यात सुरु झालेल्या कल्याणकारी योजना कदापी बंद होणार नाहीत. जव्हारच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना कटिबद्ध असल्याचे सांगत त्यांनी नगरपरिषद निवडणुकीत शिवसेनेला विजयी करण्याचे आवाहन मतदारांना केले. वाडा हा शिवसेनेचा बालेकिल्ला असून त्यावर शिवसेनेचेचा भगवा फडकेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. वाडा नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेकडून हेमांगी पाटील निवडणूक लढवत असून शिवसेनेच्या नगरसेवकांमध्ये दोन मुस्लिम महिलांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# कुंभारी ता.कोपरगांव येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय शिर्डी यांची कारवाई

## वाळु तस्कराकडून १५,२०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । प्रतिनिधी**

या बातमीची हकीगत अशी की,श्री सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अवैधरित्या गौणखनिजांचे उत्खनन करुन वाहतुक करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत. सदर आदेशानुसार अमोल भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी उपविभाग शिर्डी यांनी सफौ इरफान शेख, पोहेकॉ अशोक शिंदे,पोहेकॉ/दत्तात्रय तेलोरे यांचे पथक तयार करुन अवैधरित्या गौणखनिजांचे उत्खनन करुन वाहतुक करणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना व मार्गदर्शन करुन पथक रवाना केले. वरील पथक दिनांक २१/११/२०२५ रोजी कोपरगाव तालुका पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैधरित्या गौणखनिजांचे उत्खनन



करुन वाहतुक करणारे इसमांची माहिती काढत असतांना पथकास एक इसम एक पिवळे रंगाचे विना क्रमांकाचे ढंपर वाहनामध्ये अवैधरित्या चोरुन वाळु भरुन धारणगांव ते कोळपेवाडी ता. कोपरगांव या रस्त्याने वाहतुक करत असल्याची माहिती मिळाली. पथकाने तात्काळ कुंभारी शिवारात रस्त्यावर जावुन सापळा रचुन थांबले असता बातमीतील नमुद एक पिवळे रंगाचे विना क्रमांकाचा ढंपर येताना दिसला. त्यावेळी पथकाची खात्री झाल्याने पथकाने नमुद ढंपर यास थांबवुन खात्री केली असता सदर गाडीचे पाठीमागील हौदामध्ये वाळु भरलेली असल्याचे दिसुन आले. पथकाने गाडी चालकास त्याचे नांव गांव विचारता गाडी चालकाने त्याचे नांव १)गोरख एकनाथ जाधव वय २२ वर्षे, रा. शहाजापुर ता. कोपरगांव असे असुन गाडीचा मालक २) योगेश संजय कोळपे रा. कोळपेवाडी ता. कोपरगांव हे असल्याचे सांगितलेआहे. ताब्यातील इसमाचे कब्जातुन १०,०००/- रुपये किमतीची २ ब्रास वाळु व १५,००,०००/- रुपये किमतीची एक पिंवळे रंगाचे विना क्रमांकाचे ढंपर व १०,०००/-एक जिओ कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट असा एकुण १५,२०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन पोहेकॉ/७९२ अशोक रामा शिंदे यांचे फिर्यादीवरुन कोपरगांव तालुका पोलीस ठाणे गु.र.नं. ३२७/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ई), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई श्री. सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, श्री सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपुर यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली अमोल भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी उपविभाग शिर्डी यांनी व त्यांचे पथकाने केलेली आहे.

# मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



स्व.सौरभ चौरे प्रतिष्ठान, मायाभाई फ्रेंड सर्कल,व मित्र परिवार सुरभि हॉस्पिटल व जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने स्व.सौरभ चौरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीराचे आयोजन मंगळवार दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या कालावधीत सातपुते तालीम जवळ, नालेगाव येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.
या शिबिरात सुरभी हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर हृदयरोग तज्ज्ञ डॉ.गणेश मैड,हृदयरोग तज्ज्ञ डॉ.अमित भराडीया, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विलास व्यवहारे, स्त्रीआरोग्य तज्ज्ञ डॉ.सुलभा पवार,मूत्रविकार तज्ज्ञ डॉ.प्रशांत सरवदे आदी तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत हे शिबिर संपन्न होणार आहे.शिबिरा अंतर्गत -मोफत तपासणी,मोफत रक्तातील साखर तपासणी,मोफत इसीजी सर्व रक्त लघवी तपासणी ५०% सवलतीच्या दरात केल्या जाणार आहेत.तसेच अँजिओग्राफी औषधांच्या खर्चासहित २५००रु.,टु डी इको तपासणी ७००रु.,सोनोग्राफी ७००रु.तपासणी केली जाईल.तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत मुतखडा, प्रोस्टेट शस्त्रक्रिया आणि अँजिओप्लास्टी,हृदयाच्या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी अभिजित भगत-मो.नं.९६८९५८१७३७,किरण रोकडे-मो.नं.८३६९३८२५२५,राज गोसावी-मो.नं. ९२४८४४३५५६० यांच्याशी संपर्क साधावा.

## भिसेगाव प्रभागात अंबे भवानी मातेचे दर्शन घेऊन

# कर्जत परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**कर्जत । प्रतिनिधी**

कर्जत परिवर्तन विकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पुष्पाताई हरिश्चंद्र दगडे व प्रभाग क्रमांक ५भिसेगाव प्रभागातील नगरसेवक पदाचे उमेदवार दिनेश जयराम ठोंबरे व राधिका पिंट्या पवार यांनी २२नोव्हेंबर २०२५ रोजी भिसे गाव परिसरातील ग्रामदैवत अंबे भवानी मंदीरात अंबे भवानी मातेचे पुष्पहार अर्पण करून श्रीफळ वाढवून आशीर्वाद घेतले व प्रचाराला सुरुवात केली. यावेळी उमेदवारांनी गावातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी प्रभाग क्रमांक ५ भिसेगाव प्रभागात नगराध्यक्ष व नगरसेविका पदाचे उमेदवारांनी प्रभागात भिसेगाव परिसरातील



आदिवासी वाडी.कृषी संशोधन केंद्र परिसरात माय बाप मतदारांच्या गाठी भेटी घेत प्रचारामध्ये आघाडी घेतली. यावेळी त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी अनेकांनी त्यांना आशीर्वाद देत शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत,बीएसाआरपीचे जिल्हाध्यक्ष उत्तम जाधव, माजी नगराध्यक्षा ,भगवानशेठ भोईर, युवा सेनेचे संपत हाडप, शिवसेना नेते शरद हजारे , माजी नगरसेवक सोमनाथ ठोंबरे ,जगदीश दिसले महेंद्र कानिटकर,माजी नगरसेवक उमेश गायकवाड, राकेश देशमुख , चंद्रकांत राऊत,शरद ठोंबरे ,आदी परिवर्तन विकास आघाडीचे विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यात श्री अनिरुद्ध पथक यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे । प्रतिनिधी**

देशात दर दोन सेकंदामागे एका व्यक्तीला रक्तपुरवठ्याची गरज भासते. आपल्यातील तीन जणांपैकी दोघांना आयुष्यात एकदा तरी रक्ताची आवश्यकता निर्माण होते कारण विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी मानवी रक्ताला अजूनही पर्याय मिळालेला नाही म्हणूनच रक्तदानाचा अर्थ जीवनदान असा होतो. आपल्या देशाच्या लोकसंख्या पैकी ६० टक्के रक्तदान करण्यासाठी सक्षम असतात पण वर्षाकाठी यातले एक टक्का इतकेच रक्तदानासाठी पुढे येतात त्यामुळे आपल्या देशाला दरवर्षी सुमारे ३० लाख युनिट्स इतकी रक्ताची कमतरता भासते याच कारणामुळे रक्तदान हा आपल्या कर्तव्याचा भाग ठरतो.
गेली दोन दशकांहून अधिक काळ श्री अनिरुद्ध आदेश पथक, दिलासा मेडिकल ट्रस्ट अँड रिहॅबिलिटेशन सेंटर, अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ




डिझास्टर मॅनेजमेंट, अनिरुद्ध समर्पण पथक या संस्था रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहे. डॉ. अनिरुद्ध जोशी एमडी मेडिसिन, (सद्गुरु श्री अनिरुद्ध बापू) यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाने स्थापन झालेल्या या संस्थांनी १९९९ सालापासून रक्तदान शिबिरांचे आयोजन करून आत्तापर्यंत १.६५ लाख युनिट इतके रक्तदान संकलित केले आहे. परमात्म्यास नऊ प्रकारचे थेंब अत्यंत आवडतात, ज्यात एका श्रद्धावानाने दुसर्या श्रद्धावानांसाठी निरपेक्ष भावनेने केलेल्या रक्तदानाचे थेंबही महत्त्वाचे आहेत', असे सद्गुरु श्री अनिरुद्धांनी श्रीमद्पुरुषार्थ ग्रंथराजाच्या 'आनन्दसाधना' या तृतीय खंडात सांगितले आहे याच पंक्ती नुसार आज दिवा शहरात श्री अनिरुद्ध आदेश पथक यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते यात शेकडो नागरिक व भक्त यात सहभाग घेऊन रक्तदान केले आहे.

# संविधान चषक क्रिकेट स्पर्धेला उत्साहपूर्ण सुरुवात

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर उपनगरातील निर्मल नगर पाऊलबुद्धे ग्राउंड येथे आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश भाऊ बनसोडे यांच्या वतीने संविधान चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या विशेष स्पर्धेत चाळीस वर्षांपुढील खेळाडूंना संधी देण्यात आली असून एकूण १२ संघांचा सहभाग नोंदविण्यात आला आहे. पाच दिवस चालणाऱ्या या स्पर्धेमुळे ज्येष्ठ खेळाडूंत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्पर्धेचे उद्घाटन नारळ वाढवून व चेंडू टोलवून करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे शहर जिल्हा अध्यक्ष सुरेश भाऊ बनसोडे यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी संदीप पाटोळे, प्रमोद घाडगे, नितीन कचकल, गजु भांडवलकर, संजय आल्हाट, चांगदेव घोडके, संदीप मंडलिक, नाना जाधव, उदय देहरे मेजर, महेश गोगे, अनिल गायकवाड, संदीप सगळगिले आदी मान्यवर व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्पर्धेचे आयोजन संदीप पाटोळे, प्रमोद घाडगे व नितीन कचकल यांनी केले असून परिसरात खेळ संस्कृती वाढवण्याचा उद्देश यातून साधला जात आहे.या वेळी सुरेश बनसोडे म्हणाले की, क्रिकेट आणि फिटनेस. वय काहीही असलं तरी खेळणं खूप महत्त्वाचं आहे. खेळल्याने आपले शरीर तंदुरुस्त राहते, मन आनंदी राहते आणि आजारांपासून आपलं संरक्षण होते. या स्पर्धेत चाळीस वर्षांपुढील काका, दादांनी भाग घेतला आहे. हे आपल्यासाठी खूप मोठं उदाहरण आहे. वय वाढलं तरी स्वप्नं आणि उत्साह कधीच कमी होत नाही, हे ते दाखवत आहेत.
आपल्या देशाला संविधान मिळालं म्हणून आपल्याला हक्क, स्वातंत्र्य आणि समानता मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या या संविधानामुळे आज आपण अभिमानाने जगतो. याच संविधान दिनी या स्पर्धेची फायनल खेळवली जाणार आहे. हा आपल्या देशाबद्दल, संविधानाबद्दल आणि खेळाबद्दलचा आदर असल्याची भावना व्यक्त केली व शहरातील जास्तीत जास्त खेळाडूंनी स्पर्धा बघण्यासाठी यावे असे आव्हान देखील आयोजकांच्या वतीने करण्यात आले.



# शेवडी (बा) ता.लोहा जि.नांदेड येथे कै.सौ.वैशालीताई धोंडे यांच्या शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहणाचा भव्य सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिलोळे**

–शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या अर्धांगिनी कै.सौ. वैशाली धोंडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त शिवा स्मृती मंदिरात शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहणाचा मंगल सोहळा गुरुवार दि. २४ नोव्हेंबर रोजी गुरुवर्य शंभुलिंग शिवाचार्य महाराज (उदगिरकर) यांच्या शुभहस्ते पार पडला.प्रा. धोंडे यांनी आपल्या वडिलांचे – बाबाराव धोंडे(बापु), आई राधाबाई (माय) धोंडे, मोठे बंधू शिवराज धोंडे तसेच पत्नी कै.सौ. वैशाली धोंडे यांचे लिंगस्थापनेसह सुबक अर्धाकृती पुतळ्यांसह शिवा स्मृती मंदीर उभारले आहे. गावालगतच्या आपल्या शेतात मळ्यामधील शांत परिसरात उभारलेल्या या स्मारक मंदिराला उपस्थित मान्यवरांनी विशेष दाद दिली.

सोहळ्यानंतर शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कार प्राप्त शिवकिर्तनकार शि.भ.प. श्री शिवशरण गुरुजी रटकलकर यांनी भावपूर्ण शिवकिर्तन सादर केले. आपल्या किर्तनातून त्यांनी कै. वैशालीताईंच्या स्मृतींना उजाळा देत सर्व उपस्थितांना अश्रू अनावर केले. त्या प्रा. धोंडे सरांच्या केवळ अर्धांगिनी नव्हत्या तर पूर्ण भागीदार होत्या, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.त्यानंतर बऱ्याचशा शिवाचार्यांची आर्शिवचन केले .वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज वसमतकर (बापू) यांनी आशीर्वचन देताना म्हणाले, विरशैव धर्मामध्ये लिंगासोबत जन्म, जीवन आणि अंतःकरणाचे एकरूप होणे हेच तत्त्व आहे. वैशालीताईंच्या कार्याची किर्ती चंद्र-सूर्य आसे पर्यंत कायम राहील. आज १८ शिवाचार्य आणि १९वे 'लिंगतत्त्व' अशा पवित्र उपस्थितीत होत असलेला हा सोहळा अत्यंत मंगल आहे.कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये शिवा संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार, राष्ट्रीय उपाध्यक्ष उमाकांत आप्पा शेटे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख



–बाबुराव मोरे, वैजनाथ अण्णा तोनसुरे, माजी जि.प. सदस्य डॉ. कालिदास मोरे, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख अशोक पाटील मोरे, युवा उद्योजक धनाजी दिघे, राज्य सरचिटणीस धन्यकुमार शिवनकर, माजी नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी,मन्मथ महाराज डांगे, लक्ष्मण महाराज विभुते, सेवा जनशक्ती पार्टी चे प्रदेश प्रवक्ते – विठ्ठल ताकबिडे सर, राष्ट्रवादी पक्षाचे लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शरद पाटील पवार,सेवा जनशक्ती पार्टी चे कंधार तालुकाध्यक्ष – मयुर सावकार नळदकर,सेवा जनशक्ती पार्टी चे किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष – उत्तम मामा भागानगरे,शिवा संघटनेचे लोहा तालुकाध्यक्ष – रविराज होळगे, रामचंद्र यईलवाड,माधवराव पावडे,मनोज शेलगावकर, जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, उपसभापती अन्नाराव पवार, आझाद ग्रुप संस्थापक भिमाशंकर कापसे,माऊली पाटील पवार,सरपंच – राजु उदगिरे, सरपंच – दयानंद पाटील येवले,आदींचा समावेश होता.सोमनाथ उर्फ रविराज किडिले यांच्या गायक समूहाने भावगीत व भक्तीसंगीत सादर करून वातावरण अधिक मंगलमय केले.प्रा. मनोहर धोंडे यांनी सर्व गुरुवर्य, शिवकिर्तनकार, गायक, वादक, मान्यवर, पंचक्रोशीतील नागरिक, तसेच महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणातील आगमन केलेल्या शिवाचार्यांचे मनःपूर्वक आभार मानले. माझ्या पत्नीच्या निधनानंतरच्या कठीण प्रसंगी ४८ शिवाचार्यांनी घरपोच येऊन आमचे सांत्वन केले – हे माझ्यासाठी आयुष्यभराचे भाग्य आहे, असे ते म्हणाले.कार्यक्रमाचा समारोप महाप्रसादाने करण्यात आला.

## अखेर 'अतिरिक्त' शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबणार नाही!

# शिक्षणाधिकारी प्रवीण अहिरे यांचा कर्मचाऱ्यांच्या मागणीला तत्काळ होकार

### नंदुरबार संघटनेच्या पाठपुराव्यामुळे ग्रंथापाल लिपिक, वर्गाला मोठा दिलासा

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

सन २०२४-२०२५ च्या संच मान्यतेत अतिरिक्त ठरलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न तात्काळ मार्गी लागला आहे. दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी नंदुरबार जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर सेवक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अमित मराठे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी प्रवीण अहिरे यांची भेट घेतली.

यावेळी लिपिक,ग्रंथपाल,प्रयोगशाळा सहाय्यक, आणि शिपाई आदी अतिरिक्त होत असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवू नये, अशी आग्रही विनंती संघटनेकडून करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या आर्थिक



अडचणी आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न लक्षात घेऊन, शिक्षणाधिकारी प्रवीण अहिरे यांनी या महिन्याचे वेतन काढून देण्याबाबत त्वरित होकार दिला. तत्पूर्वी संघटनेने निवेदनाद्वारे माध्यमिक शाळा संहिता आणि एम.पी.एस. १९८१ नुसार, समायोजन होईपर्यंत अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे वेतन मूळ शाळेतून अदा करणे नियमाला धरून आहे, या कायदेशीर तरतुदीकडे शिक्षणाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. संघटनेने स्पष्ट केले होते की, कनिष्ठ कर्मचाऱ्याला वेतनापासून वंचित ठेवल्यास कुटुंबावर उपासमारीची वेळ येऊ शकते.या तात्काळ दिलासाबद्दल शिक्षकेतर संघटनेच्या वतीने अध्यक्ष अमित मराठे, दिपक गोसावी, महेंद्र गाडे, प्रकाश जोहरी यांच्यासह उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्याचबरोबर नंदुरबार जिल्हा शिक्षकेतर संघटनेचे अध्यक्ष अमित मराठे यांच्या नेतृत्वाखालील पाठपुराव्याबद्दलही उपस्थित बांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली.संघटनेच्या या मागणीला प्रशासनाकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे नंदुरबार जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## तरुणांनी नशामुक्त राहणे हीच काळाची गरज-ॲड.कराड



दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

साने गुरुजी निवासी प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केज येथे नशामुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यां साठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात ॲड. उद्धवराव कराड यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा,मद्यपान यांसह सर्व प्रकारच्या व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करत नशामुक्त राहण्याचे आवाहन केले.

ॲड.उद्धवराव कराड यांनी आपल्या भाषणात सांगितले की,तरुण पिढी ही देशाची संपत्ती आहे. व्यसनामुळे आरोग्य, शिक्षण,कुटुंब आणि भवितव्य सर्वांवर दुष्परिणाम होतात. त्यामुळे तरुणांनी कोणत्याही प्रकारच्या नशेपासून दूर राहणे आवश्यक आहे.

कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत नशामुक्त समाज निर्मितीसाठी हातभार लावण्याची प्रतिज्ञा केली.

## धारूर नगरपरिषद निवडणूक व २०२५ अजय गायसमुद्रे यांना न्यायालयाने उमेदवारी अर्ज ग्राह्य ठरवत दिली निवडणूक लढवण्यास परवानगी

दैनिक वादळ वार्ता

**धारूर | प्रतिनिधी**

धारूर नगरपरिषद सर्वसाधारण निवडणूक २०२५ मध्ये वार्ड क्रमांक १० मधून भारतीय जनता पक्षाच्या चिन्हावर उमेदवारी अर्ज दाखल करणारे अजय प्रकाश गायसमुद्रे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार,किल्लेधारूर यांनी सूचकाची सही नसल्याचे कारण दर्शवत त्यांच्या उमेदवारी अर्जाला १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नकार दिला होता.या निर्णयाविरोधात नाराज उमेदवार अजय गायसमुद्रे यांनी २० नोव्हेंबर २०२५ रोजी मा.अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश,केज यांच्या न्यायालयात इलेक्शन अपील क्रमांक १/२०२५ दाखल करून निर्णयाला आव्हान दिले होते.विधीज्ञ ए.के.ससाने यांच्या माध्यमातून सादर केलेल्या अपीलात उमेदवारी फेटाळण्याचा निर्णय नियमबाह्य असल्याचा युक्तिवाद करण्यात आला.दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रकरणाची सविस्तर सुनावणी करण्यात आली.दोन्ही बाजूंचे युक्तिवाद,संबंधित पुरावे तसेच महाराष्ट्र नगरपंचायत इलेक्शन रुल्स १९६६ मधील तरतुदींचा विचार केल्या नंतर



माननीय न्यायालयाने अजय गायसमुद्रे यांच्या बाजूने निर्णय देत अपील मंजूर केले.न्यायालयाने निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार,किल्ले धारूर यांनी दिलेला उमेदवारी अर्ज बाद करण्याचा आदेश रद्द ठरवून अजय प्रकाश गायसमुद्रे यांचा अर्ज कायदेशीर व ग्राह्य ठरविला आहे.त्यामुळे आता ते वार्ड क्रमांक १० 'अ' मधून अधिकृतरित्या निवडणूक लढविणार आहेत.या प्रकरणात विधीज्ञ ए.के.ससाने यांनी महत्त्वपूर्ण युक्तिवाद मांडला,तर त्यांना विधीज्ञ आशिष टोपे यांनी कायदेशीर सहाय्य केले. निर्णयामुळे धारूरमधील निवडणूक वातावरणात नव्या घडामोडींना सुरुवात झाली आहे.

# डिजिटल क्रांती: नंदुरबारमधील जि.प.शाळा बोरविहीर बनली 'स्मार्ट' शाळेचा आदर्श!

### तंत्रज्ञानाधारित शिक्षणामुळे १००% उपस्थिती, १००% विद्यार्थी प्रगत

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळाही आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून शिक्षण क्षेत्रात किती मोठी प्रगती साधू शकते, याचे मूर्तिमंत उदाहरण नवापूर तालुक्यातील रायपूर केंद्रातील जि. प. शाळा बोरविहीरने उभे केले आहे. ही शाळा आता केवळ एक सामान्य शाळा राहिली नसून, ती आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारी एक डिजिटल शाळा म्हणून ओळखली जाते.

बोरविहीर शाळेने डिजिटल शिक्षणासाठी मजबूत पायाभूत सुविधा उभारल्या आहेत. शाळेतील प्रत्येक वर्गात दोन लॅपटॉप, प्रोजेक्टर, डिजिटल बोर्ड आणि टीव्ही आधारित शिक्षण प्रणाली यांसारखी आधुनिक साधने उपलब्ध आहेत. या



साधनांच्या मदतीने शिक्षक विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिडिओ, डिजिटल उपक्रम, कथा, कविता आणि गणितीय सादरीकरणे अशा विविध आकर्षक माध्यमांतून शिकवत आहेत. विशेष म्हणजे, विद्यार्थी स्वतः ही साधने हाताळत असल्याने त्यांची जिज्ञासा आणि तांत्रिक कौशल्ये विकसित होत आहेत. शाळेतील उपक्रमशील शिक्षक संजू गावित हे या यशाचे केंद्रस्थान आहेत. ते विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण देत नाहीत, तर त्यांना प्रत्यक्ष लॅपटॉप हाताळण्याचे, शैक्षणिक वेबसाइट्स वापरण्याचे आणि डिजिटल क्रियाकलाप तयार करण्याचे प्रशिक्षण देतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थी केवळ शिकत नाहीत, तर तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळवत आहेत. शाळेत डिजिटल शिक्षण सुरू झाल्यानंतर अत्यंत सकारात्मक आणि प्रभावी परिणाम दिसून आले आहेत. डिजिटल माध्यमातून शिक्षण आनंददायी झाल्यामुळे विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती १००% झाली आहे., शिकण्याची गती, समज आणि सहभाग वाढल्याने शाळेतील १००% विद्यार्थी प्रगत झाले आहेत., डिजिटल साधने हाताळण्याच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा तांत्रिक कौशल्यांबाबतचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे.

या यशामुळे जि. प. शाळा बोरविहीर ही ग्रामीण भागातील शाळांसाठी एक आदर्श ठरली आहे, जी दाखवते की योग्य दृष्टीकोन, उपक्रमशील शिक्षक आणि तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वदूर पोहोचू शकते.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात गुरु तेग बहादूर शहीद दिन,इंदिरा गांधी व झाशीची राणी जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड यांच्यावतीने दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजी गुरु तेगबहादूर शहीद दिन साजरा करण्यात आला.सर्वप्रथम गुरू तेगबहादूर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन वंदन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी माजी सरपंच रामराजे गायकवाड हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून रावसाहेब जाधव, संजय सोनवणे,सिंधु आदमाने,संभाजी लवटे, अरुण गायकवाड,यशवंत सौदागर,सुशांत सौदागर, कृष्णा गव्हाणे,विराज राऊत,नितीन गव्हाणे, रविंद्र



गायकवाड यांची उपस्थिती होती.यावेळी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते, प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी गुरु तेगबहादूर यांचा जीवन – परिचय मांडला.यावेळी संजय सोनवणे, रावसाहेब जाधव,सिंधु आदमाने,यशवंतसौदागर, अर्जुन साबळे यांनी थोडक्यात मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोप रामराजे गायकवाड यांनी केला.दि.१९ नोव्हेंबर २०२५ रोजी माजी पंतप्रधान भारतरत्न इंदिरा गांधी व झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम भारतरत्न इंदिरा गांधी व झाशीची राणी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांचेछोटेखानी व्याख्यान झाले.आपल्या व्याख्यानात आयर्न लेडी भारतरत्न इंदिरा गांधी व महानयोद्धा झाशीचीराणी यांची जीवनगाथा यासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.प्रमुख पाहुणे म्हणून अरुण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, एस.के.वैरागे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते,प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.कार्यक्रमाला वाचक,हितचिंतक, विद्यार्थी,युवक,जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077